शहरातील अथवा शहराबाहेरील आराखडयास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परिपत्रक क्रमांक-आरएमआर १०९५/सीआर २८१/रस्ते १.
मंत्रालय, मुंबई ४०० ३२.

दिनांक-२/१२/१९९६

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे निरनिराळ्या शहरातून जाणा-या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शहराभोवती वळण रस्ते बांधण्यात येतात. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, असे वळण रस्ते बांधावयास हाती घेण्याबरोबरच किंवा असे रस्ते बांधून झाल्याबरोबर त्या रस्त्यांच्या आखणीच्या दोन्ही बाजूला नवनवीन रेखांकने (लेआऊटस्) तयार केली जातात व त्यास संबंधीत विभागांकडून परवानगी दिली जाते. अशा रेखांकना (ले आऊटस्) मधील जे भुखंड (प्लॉटस्) वळण रस्त्याला लागून असतात अशांना वळण रस्त्यापासून थेट प्रवेश हवा असतो व तो अधिकृतरित्या जरी दिला नाही तरी अनधिकृतरित्या तो घेतला जातो. यामुळे फार थोडया अवधीतच वळण रस्त्यांचे रुपांतर गावातील स्थानिक रस्त्यांमध्ये होते . परिणामत: स्वतंत्र एक वळण रस्त्याची गरज भासू लागते.

२. अशी परिस्थिती टाळण्यासाठी असे आदेश देण्यात येत आहेत की, नगर विकास विभाग व महसूल विभागाच्या अधिका-यांनी रेखांकनास मंजूरी देतांना अशी खात्री करुन घ्यावी की, रेखांकनामधील वळण रस्त्याशेजारील भूखंडास शहर योजनेतील एखाद्या मोठया अंतर्गत रस्त्यावरुन प्रवेश राहिल. यामुळे वळण रस्त्यांना ठिकठिकाणी पंक्चर न येता मोजक्या व पूर्वनियोजित ठिकाणी पंक्चर राहतील. शहराची योजना मंजुर करताना अशा मोठया वळण रस्त्याशेजारुन सेवामार्गाची (सर्व्हीस रोड्सची) नियोजनात तरतूद केली तर हा उददेश सफल होऊ शकतो.

तरी सर्व जिल्हाधिकारी व नगर विकास अधिकारी (टाऊन प्लॅनिंग ऑफिसर) यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, वरील सूचनेचे कटाक्षाने पालन करावे.

हे परिपत्रक नगर विकास विभाग व महसूल व वन विभाग आणि विधी व न्याय

24 DEC 1996

विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११/९६, नवि १२ टीपीएस १०९६/दिनांक १५/२/१९९६, ५१३६, दिनांक २२/१०/१९९६ व ३६३६/सिव्हील/ए/१३१४, दिनांक १/१०/१९९६ नुसार सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ज, त्रिं, नाशिककर)
उपसचिव(रस्ते)

प्रत,